“परभणी जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील प्राथमिक व माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांना कोरोना व्हायरसमुळे (कोविड-19)निर्माण झालेल्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नंदेच्या आंतरविद्याशाखीय शिक्षणशास्त्र विषया अंतर्गत विद्यावाचास्पती (पी.एच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

लोखंडे महादेव बालासाहेब

(एम.ए.एम.एड.सेट)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.पाटील एन.एस.

प्राचार्य

वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, शिरूर (ताज)

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुलन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पान नं.
१	प्रस्तावना	२ ते ७
२	संशोधनाची गरज	७
३	संशोधनाचे महत्व	७
४	समस्या विधान	७
५	कार्यात्मक व्याख्या	८ ते ९
६	संशोधनाचे उद्धीष्टे	१०
७	गृहीतके	१०
८	संशोधनाची व्याप्ती	१०
९	संशोधनाची मर्यादा	११
१०	संशोधन पद्धती	११
११	जनसंख्या आणि नमुना निवड	११
१२	माहिती संकलनाची साधने	१२
१३	सांख्यकीय परिमाणे/माहिती विश्लेषणाची साधने	१२
१४	संशोधन प्रकरण रचना/प्रकरण योजना	१२
१५	वेळापत्रक	१३
१६	संदर्भ ग्रंथ सूची	१४
१७	संशोधक व मार्गदर्शक नाव सही	१४

"परभणी जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील प्राथमिक व माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांना कोरोना व्हायरसमुळे (कोविड-19)निर्माण झालेल्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास"

१. प्रस्तावना:-

शिक्षणाच्या संदर्भातील समस्या पहात असताना आपणाला सर्वप्रथम शिक्षण या संकल्पनेविषयी माहिती पहावी लागणार आहे. शिक्षण हा मराठी शब्दाला इंग्रजी मध्ये Education हा शब्द वापरला जातो. Education हा शब्द Educare ह्या लॅटिन शब्दापासून तयार झाल्याचा आपणास पहावयास मिळतो. शिक्षणाची ही परंपरा प्राचीन काळापासून आजतागायत चालत आलेली आपणास पहावयास मिळते.

शिक्षणाच्या व्याख्या करात असतानी अनेक व्याख्या ह्या असल्याच्या आपणास पहावयास मिळते. त्यामध्ये भारतीय, पाश्चात्य विचारवंत अशा अनेकांनी शिक्षणाच्या व्याख्या केलेल्या आहेत.

आचार्य विनोबा भावे :-

"सुप्त निद्रिस्त शक्ती जागृती करण्याचे एक साधन म्हणजे शिक्षण."

महात्मा फुले :-

"विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नितीविना गती गली
गतीविना वित्त गेले
वित्तविना शुद्र खचले
एवढे अनर्थ एका अविघेने केले."

विद्या नसेलतर एवढे अनर्थ होतात हे महात्मा फुलेने सांगितल्याप्रमाणे शिक्षणाशिवाय शुद्र, दलित, हरिजन, स्त्री, अपंग तसेच समग्र मानवजातीचा विकास होणे शक्य नाही. म्हणून शिक्षण घेतले पाहिजे पण हे शिक्षण घेत

असतानी अनेक समस्या देखील येत असतात. अशा समस्यापैकीच संशोधकाने परभणी जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक स्तरातील दारिद्रयरेषेखालील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेत असताना सतत मनामध्ये एक प्रश्न पडत होता. कि समाजातील तळागळातील लोकांपर्यंत खरेच शिक्षण पोहचले आहे का? आणि ह्या पोहचलेल्या शिक्षणाने खरेच समाजातील मागासप्रवर्गाचा विकास झाला आहे का? आणि झालेला नसेल तर का नाही झाला. अशा मागास किंवा अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा विचार व्हावा व त्यामधून त्याच्या समस्यांवर उपाय निघावेत आणि त्यांचे जीवनमान उंचावे तसे राहणीमान देखील उंचावे ही मनोमन संशोधकाची इच्छा आहे.

शिक्षणामुळे मानवाला आपले भविष्य उज्वल करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते या सामार्थ्यच्या जोरावरच तो जीवनातील विविध समस्यांना आत्मविश्वासानेसामोरे जातो.शिक्षांच्या माध्यमातूनच त्यांच्या विविध क्षमतांचा विकास साधला जातो व त्यातूनच त्यांचे जीवन गतिमान होत आसते.

पूर्वप्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण असे शिक्षणाचे सत्र पडतात.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्राथमिक व माध्यमिक स्तरातील दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्याचे ठरवले व तेही परभणी जिल्हा हा संशोधनाचे कार्यक्षेत्र असेल. परभणी जिल्हय विषयी थोडक्यात माहिती सांगताना किंवा माहिती घेत असताना असे सांगता येते परभणी जिल्ह्यामध्ये सरासरीच्या मानाने ग्रामीण भागात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. परभणी जिल्ह्यात जवळ जवळ 18 लाख 36 हजार 86 नागरिक वास्तव्य करतात. त्यापैकी 11 लाख 57 हजार 814 नागरिक साक्षर आहेत. यावरून परभणी जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे संशोधन करण्याचे ठरवले व संशोधन हाती घेतले.

दारिद्र्यरेषेचा अर्थ :-

दारिद्र्य या संकल्पनेचा अर्थ पहिल्यानंतर दारिद्र्यरेषा म्हणजे काय? या संबंधीचे विवेचन करणे, दारिद्र्य ही संकल्पना समजून घेण्यासाठी आवश्यक आहे.

जगामध्ये सर्वप्रथम दारिद्र्य रेषेची संकल्पना 19 व्या शतकाच्या शेवटी स्वीकारण्यात आली तर भारतात 1979 मध्ये ही संकल्पना स्विकारण्यात आली.

त्यानंतर भारतात दारिद्र्य रेषेच्या अनुशंगाने विविध विचारवंतानी, वेळोवेळी नेमण्यात आलेल्या योजना आयोगांनी वेगवेगळ्या दृष्टीकोनातून दारिद्र्य रेषेच्या संदर्भात अभ्यास केला. त्यामध्ये प्रामुख्याने डॉ.दांडेकर आणि रथ, मॉन्टेक अहलूवालिया, डॉ.मिन्हास, योजना आयोग, नियोजन मंडळ इत्यादींनी दारिद्य रेषासंदर्भात अभ्यास करून भारतातील दारिद्र्य रेषा निश्चित करण्याचा प्रयत्न केला.

डॉ.दांडेकर व इतर अभ्यासकांनी प्रत्येक व्यक्तींनी आपल्या शरीरासाठी दररोज आवश्यक असणाऱ्या कॅलरीज (उष्मांक) मिळविण्यासाठी जेवढा मासिक उपभोग खर्च आवश्यक असतो त्याच्या आधारे दारिद्र्य रेषा निश्चित करता येते. अशा स्वरूपाचे विचार आपल्या अभ्यासातुन मांडले आहेत.

त्यानंतर 1973-74 च्या किंमती विचारात घेऊन आखिल भारतीय दारिद्र्यरेषा (All India poverty Line) निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार “भारतात ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीला दररोज 2100 कॅलरीज (उष्मांक) आपल्या शरीराला मिळविण्यासाठी दरमहा जो उपभोग खर्च येतो ती खर्चाची रक्कम म्हणजे भारतातील दारिद्र्य रेषा होय. या दारिद्र्य रेषेच्या आधारे पुढील स्पष्टीकरण करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीस दररोज आवश्यक कॅलरीज मिळविण्यासाठी दरमहा उपभोग खर्चाची रक्कम 56 रुपये 60 पैसे इतकी तर शहरी भागातील प्रत्येक व्यक्तीस 49 रुपये 10 पैसे या रक्कमेनुसार भारतातील दारिद्र्य रेषा निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये

वेळोवेळी झालेली महागाई लक्षात घेऊन दारिद्र्य रेषा ठरविणाऱ्या दरडोई उपभोग खर्चाच्या रक्कमेत बदलही होऊ शकतो, असा ही विचार दारिद्र्यरेषेच्या संदर्भात मांडण्यात आला.

यानंतर 1993 ते 94 मध्ये योजना आयोगाने भारतातील दारिद्र्याचा अभ्यास करून याचा संबंध उत्पन्नाशी जोडण्याचा प्रयत्न केला.

त्या आधारे "1993-94 मध्ये ग्रामीण भागात दरमहा उपभोग खर्चाची रक्कम 229 रुपये तर शहरी भागासाठी दरमहा उपभोग खर्चासाठी 264 रुपये उत्पन्न हा दारिद्र्यरेषेचा आधार मानण्यात आला. यानुसार योजना आयोगाने भारतातील दारिद्र्यासंबंधी पुढील निष्कर्ष काढला तो असा कि, 1993-94 मध्ये भारतात एकूण 32 कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली जगत होते. हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या 36 % इतके आहे. असे आढळुन आले आहे.

योजना आयोगाने दारिद्र्य रेषेसंबंधी अशी ही संकल्पना केली आहे कि, या खर्चाच्या पातळीस पोषणासाठी आवश्यक असलेले किमान उष्मांक व इतर जीवनावश्यक अखाद्यवस्तू उपलब्ध होऊ शकतात ती खर्चाची पातळी म्हणजे दारिद्र्य रेषा होय आणि ही योजना आयोगाने दारिद्र्य रेषेची मांडलेली संकल्पना जागतिक बँकेनेही स्वीकारली आहे.

वरील स्पष्टीकरणाच्या आधारे दारिद्र्यरेषेचा आशय स्पष्ट करण्यात आला आहे. यानंतर दारिद्र्य या संकल्पनेचा अर्थ समजुन घेण्यासाठी सापेक्ष दारिद्र्य (Relative Poverty) आणि 'निरपेक्ष दारिद्र्य (Absolute Poverty) या संकल्पनेचा अर्थ समजुन घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय दारिद्र्याचा सखोल अभ्यास करणे अशक्य आहे. म्हणून या संबंधीचा विचार पुढील विवेचनात आला आहे.

सापेक्ष दारिद्र्य (Relative Poverty) :-

"समाजातील श्रीमंत आणि गरीब यांची तुलना करून जे दारिद्र्य ठरविले जाते त्याला सापेक्ष दारिद्र्य म्हणतात. प्रामुख्याने या प्रकारात एका उत्पन्न गटातील व्यक्तीची दुसऱ्या उत्पन्न गटातील व्यक्तीशी तुलना केली जाते."

निरपेक्ष दारिद्र्य (Absolute Poverty) :-

भारतामध्ये प्रामुख्याने निरपेक्ष दारिद्र्य आढळते. या दारिद्र्याच्या प्रकारामध्ये भिन्न व्यक्ती किंवा समूहाचा उत्पन्नाची तुलना न करता एखादी व्यक्ती दरिद्री आहे किंवा नाही हे ठरवण्याचा प्रयत्न केला जातो. " माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी किमान जीवनमानाची एक पातळी आवश्यक असते, ही पातळी गाठता येत नसेल तर ती व्यक्ती निरपेक्षपणे दरिद्री आहे असे मानले जाते. किमान जीवनमानाचा विचार करताना वर म्हटल्याप्रमाणे अन्न, वस्त्र, निवारा य मुलभूत गरजा व्यतिरिक्त पाणी, आरोग्य, शिक्षण व मनोरंजन याही गरजांचा विचार करावा लागतो. किमान आवश्यक गराजाची पूर्तता करण्यासाठी प्रचलित किमतीनुसार किती खर्च येईल याचा विचार निरपेक्ष दारिद्र्यात केला जातो." अशा प्रकारे निर्धारित केलेल्या खर्चापेक्षाही कमी माणसी खर्च असलेली लोकसंख्या या दारिद्र्यामध्ये आहे असे म्हटले जाते.

निरपेक्ष दारिद्र्याची संकल्पना तुलनात्मक गोष्टीवर आधारित नसल्यामुळे निरपेक्ष दारिद्र्य हे प्रत्यक्ष आर्थिक परिस्थिती दर्शविते तसेच देशातील प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी किमान काही मुलभूत वस्तू मिळणे आवश्यक असते व त्या सर्वसाधारण पातळी पेक्षा ज्या लोकांना मुलभूत वस्तू कमी मिळतात ते लोक निरपेक्ष दारिद्र्यात असतात. त्यामुळे दरडोई उत्पन्न, दरडोई उपभोग खर्च, अन्नधान्याचा दरडोई उपभोग या उपभोगामुळे मिळणारे दरडोई उष्मांक (कॅलरीज) इत्यादी गोष्टी समाजातील निरपेक्ष दारिद्र्य स्पष्ट करतात.

दोन दारिद्र्याच्या प्रकारची तुलना केली असता असे म्हणता येईल कि, सापेक्ष दारिद्र्यापेक्षा निरपेक्ष अधिक सरस आणि उपयुक्त आहे. जेव्हा विविध

देशातील तेथील दारिद्रयाबद्दल बोलले जाते तेव्हा ते सापेक्ष दारिद्रयाबद्दल बोलले जात नाही तर प्रामुख्याने निरपेक्ष दारिद्याबाद्‌ल बोलले जाते.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने दारिद्रयाचा अभ्यास करत असताना निरपेक्ष दारिद्र्य या प्रकारच्या आधारेच अभ्यास केला जाणार आहे.

२. संशोधनाची गरज:-

प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील दारिद्र्य रेषेखालील परभणी जिल्हयातील विद्‌यार्थ्यांचा शैक्षणिक समस्या, तसेच आर्थिक समस्या व सामाजिक मागासलेपणाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी संशोधकाने संशोधन हाती घेतले आहे किंवा गरज आहे व कोरोना मुळे या विद्‌यार्थ्यांना कोणत्या समस्या निर्माण झाल्या आहेत हे देखील प्रस्तुत संशोधनात पाहणे गरजेचे आहे किंवा संशोधक पाहणार आहे.

३. संशोधनाचे महत्व:-

प्रस्तुत संशोधनाचे महत्व सांगत आसताना आपणाला असे सांगता येते कि प्रस्तुत संशोधनातूनपरभणी जिल्हयातील दारिद्र्यरेषेखालील प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्‌यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्नांची/समस्यांची माहिती होईल व त्यावर उपाय सुचविता येतील. तसेच त्यांच्या आर्थिक स्थितीची देखील माहिती येईल व कोरोना मुळे निर्माण झालेल्या कोणकोणत्या समस्या आहेत व त्यावर उपाय कोणते आहेत हे देखील प्रस्तुत संशोधनातून समोर येईल.

४. संशोधन समस्या विधान :-

“परभणी जिल्हयातील दारिद्र्य रेषेखालील प्राथमिक व माध्यमिक स्तरातील विद्‌यार्थ्यांना कोरोना व्हायरसमुळे (कोविड-19) निर्माण झालेल्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास”

५. कार्यात्मक व्याख्या :-

परभणी जिल्हा :-

“मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी असणारा एक जिल्हा म्हणजे परभणी होय.”

“ज्या जिल्ह्याच्या पूर्वेस नांदेड व हिंगोली दक्षिणेला लातुर व बीड पश्चिमेला बीड व जालना व उतरेला हिंगोलीच्या दरम्यानच्या भौगोलिक क्षेत्राला परभणी जिल्हा म्हणतात.”

दारिद्र्यरेषा :-

१) “ज्या व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न हे मुलभूत गरजा पेक्षा कमी आहे. त्या सर्व लोकांचा समावेश हे दारिद्र्यरेषेखाली होतो. त्याला दारिद्र्य रेषा असे म्हणतात.”

२) “शासनाच्या दृष्टीकोनातून ज्या लोकांचे उत्पन्न हे किमान गरजा भागवण्याच्या दृष्टीने कमी आहे त्यांचा समावेश दारिद्र्य रेषेत होते.”

प्राथमिक स्तर (शिक्षण) :-

१) “ पहिली ते आठवी पर्यंतच्या शिक्षणाच्या स्तराला प्राथमिक शिक्षणस्तर म्हणतात.”

२) “ज्ञानसंपादनाच्या दृष्टीने आवश्यक असलेले कौशल्य व सवयी संपादन करण्याच्या दृष्टीने घेतलेल्या शिक्षणाला प्राथमिक शिक्षणस्तर असे म्हणतात.”

माध्यमिक शिक्षण स्तर :-

१) “माध्यमिक शिक्षण म्हणजे कुमरावच्या गरजा पूर्ण करण्यासाठी देले जाणारे सर्वसामान्य तंत्रक, व्यावसायिक, अगर विशेष शिक्षण होय.”

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ कायदा (XLI1965)

३) “ नववी ते दहावी पर्यंतच्या शिक्षणाच्या स्तराला माध्यमिक शिक्षणस्तर म्हणतात.”

विद्यार्थी :-

१) “अध्ययन करणारा तो विद्यार्थी होय”

२) “प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेणारा तो विद्यार्थी होय.”

कोविड-19 व्याख्या :-

1. कोरोनाव्हायरस रोग 2019 एक संभाव्य गंभीर प्रामुख्याने श्वासोच्छवासाचा आजार जो कोरोनाव्हायरसमुळे होतो आणि ताप,खोकला आणि श्वासोच्छवासाचा त्रास होतो त्याला कोविड-19 असे म्हणतात.

2. “ ज्या आजारामध्ये खालील लक्षणे दिसून येतात म्हणजे ताप, सर्दी, खोकला, हाडे दुखणे आणि श्वसनाच्या समस्या तसेच थकवा, घसा खवखवणे, स्नायू दुखणे, वास किंवा चव कमी होणे ही लक्षणे ज्या आजारामध्ये दिसतात. त्या आजाराला कोविड-19 किंवा कोरोना व्हायरस आजार असे म्हणतात”.

शैक्षणिक समस्या :-

१) “शिक्षण घेत असताना शिक्षणात येणाऱ्या आडचणी म्हणजे शैक्षणिक समस्या होय.”

२) “विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना येणाऱ्या समस्या म्हणजे शैक्षणिक समस्या होय.”

६. संशोधनाची उद्दिष्टे :-

१) दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांच्या कोविड-19 मुळे निर्माण झालेल्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेणे.

२) दारिद्र रेषेखालील विद्यार्थ्यांच्या कोविड-19 मुळे निर्माण झालेल्या सामाजिक मागासलेपनांच्या कारणांचा शोध घेणे.

३) दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांच्या कोविड-19 मुळे निर्माण झालेल्या आर्थिक समस्यांचा शोध घेणे.

४) दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांच्या कोविड-19 मुळे निर्माण झालेल्या शैक्षणिक मागासलेपनांच्या कारणांचा शोध घेणे.

७. संशोधनाची गृहीतके:-

१) दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थी आर्थिक दृष्ट्या मागे आहेत.

२) दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या मागास आहेत.

३) दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांना कोविड-19 मुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

८. संशोधनाची व्याप्ती :-

१) स्थळ व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन परभणी जिल्ह्यापुरतेच करण्यात आले आहे.

२) आशयव्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यापुरतेच मर्यादित आहे.

३) विषयव्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन प्राथमिक व माध्यमिक शालेय स्तरापुरतेच मर्यादित आहे.

४) काळ व्याप्ती:-

प्रस्तुत संशोधन सन २०२२-२०२३ कालावधी पर्यंत करण्यात येणार आहे.

९. संशोधन मर्यादा :-

१. स्थळ मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन परभणी जिल्ह्यपुरतेच मर्यादित आहे.

२. आशय मर्यादा:-

दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या पुरतेच मर्यादित.

३. **विषयाची मर्यादा:-**

प्राथमिक व माध्यमिक शालेय स्तरापुरतेच मर्यादित आहे.

४. **काळ मर्यादा:-**

प्रस्तुत संशोधन शैक्षणिक वर्षे २०२२-२०२३ करण्यात येणार आहे.

१०. संशोधनाची कार्यपद्धती:-

सदरील संशोधनाच्या अभ्यासासाठी संशोधक सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करणार आहे. सद्यस्थिती समस्या निराकरणासाठी ही उपयुक्त पद्धती आहे. म्हणून संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर करणे योग्य मानले आहे.

११. जनसंख्या :-

सदरील संशोधनासाठी जनसंख्या ही संपुर्ण परभणी जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थी ठरविण्यात आले व त्यापैकी नऊ तालुके व प्रत्येक तालुक्यातील किमान प्राथमिक दोन व माध्यमिक दोन वर्ग यातील विद्यार्थी संख्या संशोधक जनसंख्या ठरवणार आहे व संशोधनासाठी पर्याप्त नमुना संशोधक निवडणार आहे.

न्यादर्श नमुना निवड :-

सदरील संशोधनासाठी असंभाव्य न्यादर्श पद्धती मधील सहेतुक न्यादर्श नमुना निवड पद्धतीने न्यादर्श नमुना निवड करणार आहे व विद्यार्थ्यांच्या उपलब्धते नुसार नमुना निवडला जाणार आहे.

१२. संशोधनाची साधने :-

सदरील संशोधन कार्यासाठी संशोधकाने संशोधनाचे साधन म्हणून प्रश्नावलीचा, मुलाखत या साधनांचा वापर संशोधक करणार आहे.

माहितीचे संकलन :-

माहितीचे संकलन हे प्रश्नावली तसेच मुलाखत या साधनाच्या साह्याने माहितीचे संकलन केले जाणार आहे.

१३. सांख्यकीय परिमाणे/माहितीचे विश्लेषण :-

संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी संशोधकाने शेकडेवारी व सरासरी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर केला जाणार आहे.

१४. प्रकरण रचना/प्रकरण योजना

प्रस्तुत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे संशोधन आव्हाल प्रकरण योजना करण्यात येईल.

प्रकरण १. प्रस्तावना

प्रकरण २. संशोधनाशी संबंधीत साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा.

प्रकरण ३. संशोधन कार्यपद्धती

प्रकरण ४. माहितीचे संकल, विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण ५. सारांश, निष्कर्ष व शिफारशी.

१५. वेळापत्रक

प्रस्तुत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे संशोधन कार्याचे वेळापत्रक ठरविले आहे.

अ.क्र.	तपशील	कालावधी
१.	संशोधन विषय निश्चिती	२ महिना
२	संशोधन आराखडा	२ महिने
३	पूर्व संशोधन साहित्याचा आढावा	५ महिने
४	माहिती संकलन/साधन निर्मिती	२ महिने
५	स्वयं अध्यापन साहित्य विकसन	४ महिने
६	पधदर्शी अभ्यास	२ महिने
७	माहितीचे विश्लेषण	४ महिने
८	अहवाल टंकलेखन	२ महिने
९	शोध प्रबंध सादरीकरण	१ महिने
१०	एकत्री कालावधी	२ वर्षे २ महिने

समारोप :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणाला संशोधन समस्या विधान, कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा, संशोधनाची गरज, संशोधनाचे महत्व, संशोधनाची कार्यपद्धती ही वरीलप्रमाणे पहाता येते किंवा या विषयी वरील प्रमाणे माहिती पाहता येते किंवा वरील प्रमाणे सांगता येते.

संदर्भ ग्रंथ सुची

१. भितांडे वि.रा.जुलै (१९९९) "शैक्षणिक संशोधक:, नूतन प्रकाशन, पुणे.

२. Best john w. (1981) Research in Education prohilinc Hall of India Pvt.New Delhi 4th Edition.

३. मुळे रा.शं.व.उमटे वि.तु.(१९९८), "शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे", औरंगाबाद, विद्‌या बुक प्रकाशन.

४. डॉ.बी.जी.आहिरे व डॉ.दादासाहेब शिरगावे, शैक्षणिक व्यवस्थापन फडके प्रकाशन, कोल्हापुरे

५. भितांडे वि.रा.शैक्षणिक संशोधन पद्धती, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.

६. जगताप ह.ना. (१९८५) शैक्षणिक मानसशास्त्र, अनमोल प्रकाशन,पुणे.

७. डॉ.अरविंद दुनाखे (१९९८) शालेय व्यवस्थापन, प्रशासन व संघटन नूतन प्रकाशन,पुणे

८. पंडित ब.बि (२००७) शिक्षणातील संशोधन, नूतनप्रकाशन,पुणे.

९. मुळे, श.रा.व उमाटे (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, विद्‌या बुक प्रकाशन,औरंगाबाद.

१०. पंडित ब.बि. शिक्षणातील संशोधन,पुणे नुतनप्रकाशन.

११. भितांडे वि.रा., (जुलै १९९९) शैक्षणिक संशोधन पद्धती नुतन प्रकाशन,पुणे.

संशोधक विद्‌यार्थी
लोखंडे महादेव बालासाहेब

मार्गदर्शक
प्रा.डॉ.पाटील एन.एस. (प्राचार्य)
वसंतराव नाईक अध्यापक महाविद्‌यालय,
शिरूर (ताज)